


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६८७. वा | रविवार | दि. १८ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# देशात अन् राज्यात भाजपची हुकूमशाही, लोणावळ्यातील शिबिरात नाना पटोले यांचा आरोप...

**जनसंचलन/ लोणावळा**

खोटे बोला; पण रेटून बोला या पद्धतीने भाजप जनतेमध्ये भ्रम निर्माण करीत आहे. देशात भाजपच्या वतीने जी खोटारडी व्यवस्था आली आहे, त्याचे वास्तव जनतेसमोर मांडण्याचा निर्णय काँग्रेसच्या शिबिरात घेतला आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण केले नाही. आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केला जातो. एक प्रकारे देशात व राज्यात तानाशाही सुरू आहे,फ असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.शिबिराला गैरहजर राहिलेल्या काँग्रेसच्या आमदारांच्या संदर्भात प्रश्न विचारला असता पटोले म्हणाले, ङ्गअनेक आमदारांनी या शिबिरात हजेरी लावली आहे. मात्र, काहींनी मतदारसंघातील पूर्व नियोजित कार्यक्रमांना जाण्यासाठी परवानगी घेतली होती. काहींनी यापूर्वीच त्यांच्या महत्त्वाच्या वैयक्तिक कामांच्या कारणांमुळे उपस्थित न राहण्यासंदर्भात कळवले होते. मात्र, ज्या सात आमदारांनी कोणतीही कल्पना न देता गैरहजेरी लावली, त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यासंदर्भात पक्ष प्रभारींना सूचना दिल्या आहेत.लोकांना भाजप नकोय. भाजप फक्त हवा करीत आहे. आमच्या रक्तातच काँग्रेस आहे. त्यामुळे काही झाले तरी मरेपर्यंत काँग्रेस सोडणार नाही,फ असे आमदार प्रणिती शिंदे यांनी स्पष्ट केले. चंद्रशेखर बावनकुळे काँग्रेसला संपवण्याची स्वप्न पाहत आहेत. त्यांचा स्थानिक पातळीवरील अभ्यास कमी आहे. अशोक चव्हाण भाजपसोबत गेले तरी नांदेडमधील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आमच्यासोबत आहेत. मी शेवटपर्यंत काँग्रेस सोबतच काम करणार असून, एक दिवस भाजपला संपवणारच,फ असे शिंदे यांनी सांगितले.राज्यात मुस्लिम जनसंख्या साडेअकरा टक्के असताना मुस्लिम समाजाला लोकसभेत आणि विधानसभेत पुरेसे प्रतिनिधीत्व मिळत नसल्याबद्दल माजी खासदार हुसेन दलवाई यांनी नाराजी व्यक्त



केली. काँग्रेस आणि इंडिया आघाडीने मुस्लिम समाजाला महाराष्ट्रातून लोकसभेच्या किमान तीन आणि विधानसभेसाठी २० जागा द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी या वेळी केली.

## शेलसुर येथे रविकांत तुपकरांवर जेसीबीने पुष्पवृष्टी; एल्गार परिवर्तन मेळाव्यानिमित्त गावकऱ्यांकडून जोरदार स्वागत...

**जनसंचलन/ चिखली**

एल्गार परिवर्तन मेळाव्याफनिमित्त चिखली तालुक्यातील शेलसुर येथे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. गावातील तरुणांनी एकत्र येऊन रविकांत तुपकर यांच्यावर जेसीबीने पुष्पवृष्टी केली तर गावातून मिरवणूक काढून तुपकरांचे जंगी स्वागत केले. या मेळाव्याला परिसरातील शेतकऱ्यांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. गेल्या दोन दिवसात जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र याकडे कोणालाही लक्ष द्यायला वेळ नाही. हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसामुळे हिरावून घेतला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्यावी,अशी मागणी रविकांत तुपकरांनी यावेळी केली. एल्गार परिवर्तन मेळाव्याफ्च्या निमित्ताने शेतकरी नेते रविकांत तुपकर जिल्हा पिंजून काढत आहेत. त्यांच्या मेळाव्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार, तरुण व सर्वसामान्यांशी संवाद साधून तुपकर त्यांच्या समस्या जाणून घेत आहेत. चिखली तालुक्यातील शेलसुर येथील मेळाव्यालाही परिसरातील नागरिकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. गावातील तरुणांनी एकत्र येत जेसीबीच्या सहाय्याने रविकांत तुपकर यांच्यावर पुष्पवृष्टी करून व गावातून मोठी मिरवणूक काढून त्यांचे जंगी स्वागत केले. यावेळी प्रत्येक घरासमोर रांगोळ्या काढून तसेच दिवे, पणत्या लावून मायमाऊल्यांनी त्यांचे औक्षण केले. त्यानंतर झालेल्या ङ्गएल्गार परिवर्तन मेळाव्याफ्ला परिसरातील शेतकऱ्यांनी जोरदार प्रतिसाद देत मोठया प्रमाणात उपस्थिती दर्शवली. यावेळी रविकांत तुपकरांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. आपण गेल्या २२ वर्षांपासून शेतकऱ्यांसाठी लढत आहोत. माझा हा लढा वैयक्तिक नसून सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी आणि तरुणांसाठीचा लढा आहे, किती संकट आले तरी आपण हा लढा सोडला नाही. आणि यापुढे देखील कितीही गुन्हे दाखल झाले कितीही वेळा जेलमध्ये जाण्याची वेळ आली, तरी आपण मागे हटणार नाही, असा निर्धार देखील यावेळी रविकांत तुपकर यांनी व्यक्त केला. गावागावातील तरुणांना तुपकरांचा मोठा प्रतिसाद मिळत आहेत. त्याचा प्रत्यय शेलसुरमध्येही बघायला मिळाला.




## खामगावात दिव्यांग भवन बांधण्याची मागणी...

**जनसंचलन/खामगाव**

जिल्ह्यामध्ये सर्वांत मोठे शहर व तालुका म्हणून खामगावची ओळख आहे. समाजातील अतिशय दुर्बल व दुर्लक्षित घटक असलेल्या दिव्यांग घटकासाठी खामगाव शहरामध्ये दिव्यांग भवनाची निर्मिती केली गेली नाही. ती तातडीने करावी, अशी मागणी प्रहार संघटनेच्या वतीने शुक्रवारी मुख्याधिकारी यांना निवेदनातून करण्यात आली आहे. खामगाव तालुक्यात व शहरामध्ये जवळपास पाच ते सहा हजार दिव्यांग नोंदणीकृत आहेत. शहरामध्ये औद्योगिक वसाहत, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा उपसामान्य रुग्णालय आहे. शहराला घाटाखालील सहा तालुके जोडलेले आहेत. दर बुधवारी सामान्य रुग्णालयात दिव्यांग तपासणीचे बोर्ड असते. त्यावेळी दिव्यांग बांधव प्रमाणपत्र मिळण्यासाठी व इतर काही शासकीय व अन्य कामांसाठी खामगाव शहरात येतात. मात्र, त्यांच्या कामाला विलंब लागत असल्यामुळे त्यांना दिवसभर ताटकळत उघड्यावर बसावे लागते. त्यांना विश्रांती घेण्यासाठी कुठेही जागा उपलब्ध नाही. त्यामुळे दिव्यांग बंधू-भगिनींचे हाल होताना दिसत आहे. त्यासाठी खामगाव शहरामध्ये सर्व सोयीसुविधायुक्त असे दिव्यांग भवन बांधण्यात यावे, त्या भवनामध्ये दिव्यांगांच्या कार्यशाळा, दिव्यांग स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन शिबिर, दिव्यांगांच्या सभा असे कार्यक्रम होऊ शकतात. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात महाराष्ट्रातील प्रथम दिव्यांग भवन स्थापन झाले. त्या धर्तीवर खामगाव शहरामध्ये दिव्यांग भवन असणे गरजेचे आहे. निवेदन प्रहार अपंग क्रांतीचे जिल्हा सचिव किशोर माहोकार, खामगाव तालुकाध्यक्ष विजय श्रीनाथ, शहराध्यक्ष आशिष सोनोने आदींची स्वाक्षरी आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भाऊ, साहेब, ताईंनी जिल्ह्यासाठी केले काय? शेतकऱ्यांच्या समस्यांवर सभागृहात मुके राहणारे हे कसले नेते? : संदीप शेळके

## खासदारकीची संधी द्या ; जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करू...

**जनसंचलन/ शेगाव**

वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथ यात्रेच्या शेगाव तालुक्यातील जानोरी येथील हाऊस फुल जाहीर सभा संदीप शेळके यांच्या रोखठोक भाषणांनी गाजली! नुसतीच गाजली नाही तर वादळी ठरली अन त्याचे पडसाद संपूर्ण शेगाव तालुक्यात उमटले. जानोरी येथील मुक्कामी सभेत आक्रमकपणे बोलताना संदीपदादांनी शेतकरी, कष्टकरी अन बेरोजगार युवकांच्या व्यथा, वेदना, समस्यांना तोंड फोडतानाच जिल्ह्यातील नेत्यांवर टीकेचा आसूड उगारला. १६ फेब्रुवारीच्या रात्री उशिरा संपलेल्या या जाहीर सभेत गावकरी, माता भगिनी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना शेळके यांनी जिल्ह्याच्या मागासलेपणावर प्रकाश टाकला. कृषी , सांस्कृतिक, अध्यात्मिक, साहित्य, कर्तृत्व यामध्ये कश्याच बाबतीत जिल्हा कमी नाही. मग जिल्ह्याचा विकास का झाला नाही असा सवाल करून ते म्हणाले की, मागासलेला जिल्हा म्हणून बुलडाण्याचा उल्लेख होतो तेंव्हा माझ्या मनाला वेदना होतात. यासाठी जिल्ह्यातील नेतेमंडळी, खास करून आमदार, खासदार जवाबदार असल्याचा थेट आरोप त्यांनी केला. या दीर्घ काळात नेते व भाऊ, साहेब, ताई, दादा, बनलेल्या या नेत्यांनी विकासाकडे सर्रास दुर्लक्ष केले. केवळ रस्ते, नाल्या, सभागृह, पांदन रस्ते म्हणजे विकास नव्हे. मुळात जिल्ह्यातील खासदार व आमदारांकडे परिपूर्ण व आधुनिक विकासाची दृष्टीच नाही. यामुळे जिल्हा परिषद, नगर परिषद, व ग्रामपंचायत यांनी करावयाच्या कामातच ते समाधानी राहतात. जिल्ह्यातील शेतकरी चौफेर संकटात अडकला आहे. खरीप हंगाम उध्वस्त झालाय, रब्बीला अवकाळीचा फटका बसला. मागील वर्षीच्या अतिवृष्टीच्या नुकसानीचे, पिकविम्याचे पैसे अजून मिळाले नाहीत. काही मदत मिळाली तर शेतकऱ्यांचे बँक खाते होल्ड करण्यात येते. सीसीआयची कापूस खरेदी सुरू नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही. यामुळे जगाचा पोशिंदा समजल्या जाणाऱ्या बळीराजाच्या हाल अपेष्ठांना पारावार उरला नाही, असे भीषण चित्र असताना जिल्ह्याचे खासदार संसदेत तर आमदार विधानसभेत मूग गिळून बसतात. मौनव्रत धारण करून त्यावर आवाज उठवत नाही. हा या शिकांतिकेचा कळस आहे.

हे चित्र बदलण्यासाठी परिवर्तन ही काळाची गरज ठरली आहे. यामध्ये मला खासदारकीची संधी दिली तर जिल्ह्याचा चौफेर विकास करण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्टा करू अशी ग्वाही त्यांनी दिली. सर्व तालुक्यात खासदार संपर्क कार्यालय सुरू करून नियमित जनता दरबार भरवण्यात येईल. यामुळे नागरिकांना त्यांच्या कोणाच्याही कामासाठी जिल्ह्यापर्यंत येण्याची गरज भासणार नाही. आज मी केवळ साधारण कार्यकर्ता असताना शाहू परिवाराच्या माध्यमांने शेकडो युवक युवतींना रोजगार दिला आहे. हजारो बचत गटांना भरघोस मदत करून महिलांना स्वावलंबी व उद्योजक बनविले आहे. जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा आपण तयार केला आहे. खासदार म्हणून जनतेने संधी दिल्यास सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबध्द असल्याचे शेळके म्हणाले.

देशाला स्वतंत्र मिळून ७६ वर्ष होत आली. या दिर्घ काळात जिल्ह्याचा विकास तर सोडा पण पिण्यासाठी शूद्ध पाणी देखील हे नेतेमंडळी देऊ शकली नाही, अशी घणाघाती टीका शेळके यांनी यावेळी बोलतांना केली. जिल्ह्यातील खारपान पट्ट्यातील गावांच्या व नागरिकांच्या दुर्दशेवर त्यांनी खंत व्यक्त केली.

७६ वर्षात गावातील हजारो नागरिकांना पिण्यासाठी शुध्द देऊ शकत नाही, असे नेते काय कामाचा असा खडा सवाल त्यांनी केला. जिल्ह्यातील सहकार क्षेत्र या नेतेमंडळींनी उध्वस्त केले. तरुणांना रोजगार देणाऱ्या एमआयडीसी कडे त्यांनी दुर्लक्ष केले. यामुळे जिल्ह्यातील हजारो बेरोजगारांना कामासाठी महानगरामध्ये जावे लागते. यापेक्षा दुर्दैव ते काय? अशी मनस्वी खंत त्यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील लाखो नागरिकांशी निगडित पुनर्वसनाच्या गंभीर समस्येकडेही संदीप दादांनी यावेळी लक्ष वेधले. दीर्घ काळ रेंगाळलेल्या जिगाव सिंचन प्रकल्पाच्या पुनर्वसन, भूसंपादन च्या धिम्या गतीबद्दल त्यांनी नाराजी बोलून दाखविली. जिल्ह्याच्या टोकावरील तालुक्यातील प्रकल्प ग्रस्तांना कामे करून घेण्यासाठी जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलढाण्यात जावे लागते यासाठी हातातील कामे, मजुरी, शेतीची कामे सोडून व आर्थिक भुर्दंड सहन करून हजारो प्रकल्प ग्रस्तांना जिल्हाधिकारी कार्यालय गाठावे लागते. तिथे गेल्यावरही कामे होत नसल्याने रिकाम्या हाती त्यांना गावी परतावे लागते. आपण खासदार झालो तर यासर्व कामांसाठी तालुक्यातच समन्वय केंद्र स्थापन करणार असे वचन त्यांनी दिले.



# असोला बुद्रुक येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी

**जनसंचलन / चिखली**

तालुक्यातील असोला बुद्रुक येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती आज दिनांक १५ /२ /२०२३ रोजी असोला बुद्रुक येथे जिल्हा परिषद शाळा मराठी व उर्दू शाळा असोला येथे शालेय विद्यार्थ्यांना २०० विद्यार्थ्यांना शालेय वही व पेन देण्यात आले आहे संत सेवालाल महाराज जयंती निमित्त असोला येथील संत सेवालाल महाराज उत्सव समितीच्या वतीने देण्यात आले आहे असोला बु येथे सकाळी टी-शर्ट नाश्ता व चहा पाण्याच्या आयोजन राजुभाऊ मित्र मंडळाच्या वतीने चिखली देळगावराजा रोडवर आयोजन करण्यात आले होते तर गावांमध्ये भव्य दिव्य अशी संत सेवालाल महाराज यांची मिरवणूक काढून आनंद उत्सव सादर करण्यात आला होता संत सेवालाल महाराज यांची २८५ जयंती साजरी करण्यात आली यावेळी प्रामुख्याने राजूभाऊ मित्र मंडळाचे सदस्य तसेच सर्वच समाज बांधव हजर होते व प्रतिष्ठित ग्रामस्थ हजर होते प्रथम संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून जयंती साजरी करण्यात आली सरपंच व उपसरपंच पवार व ग्रामपंचायत सदस्य तसेच असोला बुद्रुक यांनी मोठ्या थाटामाटात सेवालाल महाराज यांची जयंती साजरी केली असोला बुद्रुक येथील उपसरपंच पवार यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे माहिती असोला बु येथे दिली त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की संत सेवालाल महाराज हे एक क्रांतिकारी संत होऊन गेले आहे त्यांनी बंजारा समाज समाजाच न सुधरवता इतर समाजासाठी सुद्धा प्रेरक म्हणून काम केलेले आहे संत सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९रोजी झाला आहे संत सेवालाल महाराज यांनी उत्तम जीवन जगण्याचा सोपा मार्ग बंजारा समाजासाठी तसेच इतर समाजासाठी सुद्धा दिला आहे त्यांच्या मार्गाने जीवन जगत असताना कोणत्याही अडचणी आपल्या जीवनामध्ये येणार नाही असे उदगार असोला बुद्रुक ग्रामपंचायतचे उपसरपंच श्री पवार यांनी असोला बु येते काढले आहे बंजारा समाजाला त्यागाची आणि समर्पणाची मोठी परंपरा आहे या जयंती उत्सवाला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ माजी सभापती अशोकराव पडघान यांनी प्रामुख्याने हाजेरी लावली होती.



# महिलेची पोत हिसकणाऱ्या आरोपींकडून ९ गुन्ह्यांची उकल...

**जनसंचलन/ खामगाव**

शहरातील महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोथ चोरी केल्याप्रकरणी पोलिस कोठडीत असलेल्या दोन्ही आरोपींनी खामगाव, शेगाव तालुक्यातच नऊ ठिकाणी चेनस्नॅचिंग केल्याची माहिती पोलिस तपासात उघड झाली आहे. पकडलेले दोन्ही आरोपी हे १८ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडीत आहेत. दरम्यान, त्यांच्याकडून आणखी गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात येणार आहे. खामगावातील आईसाहेब मंगल कार्यालया जवळ ६५ वर्षीय शोभा सुभाष खैरे यांच्या गळ्यातील मंगळसूत्र ११ फेब्रुवारी रोजी हिसकावून दोघांनी पळ काढला होता. या घटनेत पोलिसांनी बाप्या उर्फ पंडित साबळे, रा. जळगाव खान्देश याला आधीच अटक केली होती. तर त्याचा दुसरा साथीदार राकेश गोकूळ राठोड याला नाशिक येथून अटक करण्यात आली. हे दोघेही सध्या पोलिस कोठडीत आहेत. त्यांच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत. विशेष म्हणजे, या दोघांनीही केवळ खामगावच नाही तर शेगावातही जवळपास चेन स्नॅचिंगच्या चार घटना घडवल्या आहेत. यासोबतच त्यांच्यावर बुलढाणा, नाशिक, जळगाव खान्देशसह इतरही ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती पोलिस निरीक्षक पीतांबर जाधव यांनी दिली. चौकशीमध्ये आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सोमवारी मद्य विक्री बंद ठेवण्याचे आदेश...

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सोमवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी सर्व प्रकारच्या मद्यविक्रीच्या अनुज्ञाप्त्या बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्ती धारकाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोमवारी उत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. जयंती उत्सवानिमित्त संपूर्ण जिल्ह्यामध्ये शोभायात्रेसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सर्व वयोगाटातील आबालवृध्द व जनसमुदाय जमा होणार आहे. तसेच राज्यात व विशेषतः जिल्ह्यात विविध समाजातील विविध प्रवर्गातील नागरीकांच्या मागण्यांबाबत आंदोलने, मोर्चे, निदर्शने इत्यादी कारणांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी सदर उत्सव कालावधीत कायदा व सुव्यवस्था, तसेच सार्वजनिक शांतता अबाधित रहावी, यासाठी प्रतिबंधात्मक खबरदारीचा उपाय योजना म्हणून जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम १४२ नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन सोमवार, दि.१९ फेब्रुवारी २०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त बुलडाणा जिल्ह्यातील सर्व किरकोळ व घाऊक




देशी, विदेशी मद्य विक्री अनुज्ञाप्त्या बंद ठेवण्याचे आदेश दिले आहे. याबाबत अनुज्ञप्ती धारकांनी सोमवारी मद्यविक्री बंद ठेवण्याची दक्षता घ्यावी. सदर आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्ती धारकांविरुध्द कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

# जिल्ह्यात आज शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन

**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा रविवार, दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षेची भावना निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, याकरीता परीक्षेचे योगदान महत्वाचे ठरत आहे. सदर परीक्षा ही जिल्ह्यातील १३ तालुक्यात आयोजित करण्यात आली आहे. या पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी २१५ केंद्र राहणार असून ११ हजार ३२७ विद्यार्थी परीक्षा देणार आहे. तसेच आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ९८ केंद्र राहणार असून दहा हजार तीन विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सदर परीक्षा सुरळीत पार



पाडण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तेजराव नरवाडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सिध्देश्वर काळुसे, प्राथमिक शिक्षणाधिकारी बी. आर. खरात, निरंतर विभाग शिक्षणाधिकारी वैशाली ठग, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, उमेश जैन, शिक्षण विस्तार अधिकारी जयमाला राठोड, जिल्हा परीक्षा समन्वयक परिश्रम घेत आहेत.

# अवैध रेती उत्खनन व वाहतूक प्रकरणी तहसीलदार यांची धडक कारवाई , दोन टिप्पर जप्त




**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुका महसूल विभागाच्या पथकाने आज १६ फेब्रुवारी रोजी सकाळी दोन टिप्पर वाहनांवर कारवाई करत रेतीसह टिप्पर जप्त करण्यात आले आहे . तहसीलदार सचिन जैस्वाल यांचे पथकाला गोपनीय माहिती मिळाली असता सकाळी खडकपूर्णा नदीपात्रातून रेतीची अवैध वाहतूक होत असून सकाळी तीन वाजता हे टिप्पर नदीपत्रातून मलकापूर पांग्रा रस्त्याने जात आहे . महसूल विभागाच्या पथकाने मलकापूर पांग्रा येथे टिप्पर वाहन क्रमांक एम एच २८ बी बी ७५७७ हे थांबविले असता त्यामध्ये विना पावती तीन ब्रास रेती आढळून आली . तहसीलदार यांच्या पथकाने वाहन चालक गणेश गजानन बुरकुल रा . आगेफळ यांना अधिकची माहिती घेतली असता सदर वाहन कारभारी मुरकूट रा . ढोरव्ही ता . सिंदखेडराजा यांचे असल्याचे सांगितले . सदर टिप्पर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ कलम ४८(७) (८) नुसार कारवाई करीत साखरखेर्डा पोलीस स्टेशन मध्ये लावण्यात आले आहे . तर किनगाव राजा पोलीस स्टेशन अंतर्गत टिप्पर क्रमांक एम एच २८ बी बी ४१८२ यामध्ये एक ब्रास रेती आढळून आली असता त्याच्यावरही कारवाई करण्यात आली आहे . वाहन चालक लक्ष्मण माधवराव काटकर हे अवैध रेती उत्खनन व वाहतूक करीत होते . सदर वाहनाचे मालक रामेश्वर आश्रुबा भालेकर असून त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे . या पथकात तहसीलदार सचिन जैस्वाल , मंडळाधिकारी आनंद राजपूत आणि पटवारी सहभागी झाले होते . रेतीची अवैध वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाच्या पथकाने धडक कारवाई सुरु करुनही रात्रीचा फायदा घेऊन नदीपात्रातून रेतीचे उत्खनन व वाहतूक सुरुच आहे . या रस्त्यावरून रात्रीला सुसाट वेगाने ही वाहने धावताना आढळून येतात . येवढेच नाही तर महसूल कर्मचाऱ्यांच्या अंगावर जाण्याचा प्रयत्न करतात . या चोरट्या मार्गाने वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती . त्या अनुषंगाने ही धडक कारवाई करण्यात आली आहे.

# शिक्षक पतसंस्थेचा कारभार काटकसरीने व पारदर्शक करणार नवनिर्वाचित अध्यक्ष राम वाघ

**जनसंचलन/ चिखली**

तालुका प्रा. शिक्षक पतसंस्था र. नं ४२२ ची अध्यक्ष व सचिव पदाची निवडणूक पार पडली. श्री सुरेश पैठणे सर अध्यक्ष व श्री राफिक सर यांनी यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदांसाठी साठी सहा. निबंधक श्री घोंगे साहेब यांचे उपस्थितित सभा पार पडली. सभेमध्ये सभेमध्ये अध्यक्ष व सचिव पदासाठी अनुक्रमे श्री राम निंबाजी वाघ सर व श्री प्रविण वायाळ सर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी मावळते अध्यक्ष श्री सुरेश पैठणे सर सचिव श्री रफिक सर उपाध्यक्ष श्री किशोर कणखर सर व संचालक श्री भगवान चेके सर, श्री. विनायक धोंडगे सर, श्री. राम सुरुशे सर, श्री. राजू जाधव सर, श्री. प्रभाकर पाटोळे सर, श्री. सुभाष खेडेकर सर, सौ. उर्मिला शेळके मॅडम. सौ. वर्षा सोळंकी मॅडम, उपस्थित होते. राम वाघ यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता संस्थेसाठी अतिशय काटकसरीने व पारदर्शकपणे कारभार करणार व प्रत्येक सदस्याचा सन्मान ठेवणार आणि ठेवी उभारण्यासाठी सभासद संख्या वाढणे व कर्ज मर्यादा वाढवणे व जे सभासद सेवा निवृत्तीनंतर त्यांचासुद्धा येथे सन्मान करणे व त्यांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या



दिवशी त्यांचे शेअर देणे हा संस्थेचा प्रथम उपक्रम राहील जे शिक्षक वेगवेगळे क्षेत्रांमध्ये काम करतात त्यांचा त्या क्षेत्राच्या संदर्भात मानसन्मान करून त्यांच्या कार्याचा गुणगौरव करणे हे संस्थेचे उद्दिष्ट राहील अशी माहिती संस्थेचे नवा निर्वाचित अध्यक्ष राम वाघ यांनी दूरध्वनीवरून दिली आहे

# सोयाबीन आणि कापसाला भाव मिळाला तरच शेतकरी जगेल प्रा . नरेंद्र खेडेकर यांचे प्रतिपादन

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

भारत देश हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो परंतु या देशातील शेतकरी सुखी नाही , पोटभर अन्न देणार शेतकरीच जर उपाशी राहतं असतील तर लोकप्रतिनिधी संसदेत काय करतात . सोयाबीन आणि कापसाला भाव मिळाला पाहिजे अशी मागणी असतांना केंद्र सरकार दखल घेत नाही . खासदार काही बोलत नाही . असे परखड प्रतिपादन उबाठा शिवसेना गटाचे संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर यांनी १६ ला साखरखेर्डा येथे केले . शिवसेना उध्दव ठाकरे संपर्क अभियान राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने साखरखेर्डा येथे साखरखेर्डा , मलकापूर पांग्रा , शेंदुर्जन जिल्हा परिषद सर्कल मधील शिवसैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते . बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच तथा शिवसेना नेते रविंद्र पाटील हे होते तर उपजिल्हाप्रमुख बंद्री बोडखे , तालुका प्रमुख महेंद्र पाटील , अविनाश बंगाळे , पंचायत समिती सदस्य हाजी शेख शफी शेख गुलाब , सत्तार नाईकवाडी , गणेशसिंग राजपूत , हबीब बागवान , ग्रामसेवा सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष जिवनसिंग राजपूत , माजी उपसरपंच रफिक तांबोळी , माजी उपसरपंच दर्शन गवई , मधूकर रिंढे , मारोती साखरे , अक्तर पठाण , फरीद कुरेशी , वाजिद कुरेशी , शेख समीर यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते . २२ फेब्रुवारी रोजी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे हे मातृतिर्थ सिंदखेडराजा नगरीत येत आहे . ठाकरे घराण्याने कधीही राजकारण केले नाही . राजकारणाला सामाजिक कार्याची जोड देऊन लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे . तोच संस्कार आजही शिवसैनिकांमध्ये आहे . गाव तेथे सेना आजही आहे . असेही त्यांनी सांगितले . कार्यक्रमाचे संचालन माजी उपसरपंच असलम अंजूम यांनी केले

# अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील कुटुंबाचे सामाजिक, आर्थिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची साधने उपलब्ध व्हावीत, तसेच त्यांना सर्वसामान्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी महामंडळाने नाविण्यपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. महामंडळामार्फत नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सुरु झालेल्या सुविधा कर्ज योजना उद्दीष्टे ३० लाभार्थी असून प्रकल्प रक्कम ५ लाख, महिला समृध्दी योजना उद्दीष्टे २५ लाभार्थी असून प्रकल्प मर्यादा १ लाख ४० हजार व शैक्षणिक कर्ज योजना देशांतर्गत शिक्षणासाठी ३० लाख व परदेशांतर्गत ४० लाख रूपये आहे. लाभार्थ्यांना सदर योजनेंतर्गत प्राप्त होणारे कर्ज प्रस्ताव .. या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावे लागणार आहे. अर्ज केल्यानंतर त्यांच्या तीन प्रती मूळ कागदपत्रांसह साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलडाणा येथे सादर करावे लागणार आहे. कर्ज प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दि. ११ मार्च २०२४ आहे. अर्जासोबत अर्जदाराचा जातीचा दाखला, कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला, उत्पन्न मर्यादा ३ लाखापर्यंत असून तहसीलदार यांच्याकडुन घेतलेला असावा, नुकताच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटोच्या तीन प्रती जोडाव्यात, रेशन कार्डची झेरॉक्स प्रत, आधार कार्ड झेरॉक्स प्रत, आधार लिंक मोबाईल कमांक, मतदान कार्ड, अर्जदाराचा शैक्षणिक दाखला, ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल, त्या जागेच्या उपलब्धतेचा पुरावा, ज्याठिकाणी व्यवसाय करावयाचा असेल, त्या जागेची भाडे पावती, करारपत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा, एनएसएफडीसी योजनेखाली वाहन खरेदी करण्यासाठी ड्रायव्हिंग लायसन्स व आरटीओकडील प्रवाशी वाहतूक परवाना, वाहन खरेदीसाठी वाहनाच्या बुकिंग, किंमतीबाबत अधिकृत विक्रेता, कंपनीकडील दरपत्रक, व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र, तसेच अनुभवाचा दाखला, व्यवसायासंबंधी प्रकल्प अहवाल, खरेदी करावयाच्या माल, साहित्याचे कोटेशन, प्रतिज्ञापत्र साद करावे लागणार आहे. अन्य शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा. उद्योग आधार, शॉप ॲक्ट लायसन्स, तसेच कर्ज मंजुरीनंतर कर्ज परतफेडीच्या हमीसाठी दोन सक्षम जामिनदार घेण्यात येणार आहे. अर्जदाराचे



सिबील स्कोअर ५००च्या वर असावा. अर्जदाराचे वय १८ वर्ष पूर्ण असावे, तसेच ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. कर्ज मंजुरीनंतर दोन सक्षम जामीनदाराच्या वैधानिक दस्तऐवजाची पूर्तता केल्यावरच कर्ज वाटप करण्यात येईल. या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक जे. एम. गाभणे यांनी केले आहे.

# धाड नाका मित्र मंडळातर्फे शिवजयंती उत्सवाची जय्यत तयारी...




**जनसंचलन/बुलडाणा**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त बुलढाणा नगरी सजली आहे. विशेष म्हणजे या वर्षी बुलढाणा नगरी मध्ये ऐतिहासिक सोहळा राहणार आहे.छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक या वर्षी तयार झालेले आहे.जिल्हावासियाचे स्वप्न आज पुर्ण झाले आहे. धाडा नाका मित्रमंडळाची तयारी मोठ्या उत्साहात सुरू आहे. अजिंठा किंवा संभाजीनगर कडून येणाऱ्या प्रवाशांना सुध्दा धाडा नाका परिसर हा रोशनाईने सजलेली दिसत आहे. जिल्हा नव्हे,राज्य नव्हे तर संपुर्ण जगात मोठ्या उत्साहात महाराजांची जयंती साजरी करण्यात येत आहे. धाड नाका मित्रमंडळातर्फे मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात येत आहे. धाड नाका परिसरात असणारी रायगड कमान हि लाईट व रंगेबीरंगी लाईटींगने सजली आहे.धाड नाका मित्रमंडळ सदैव सामाजिक कार्य असो किंवा थोर महापुरूषांच्या जयंती सदैव अग्रेसर असणारे मित्रमंडळ आहे. सुखदुखात सदैव धावून जाणारे हे मित्रमंडळ आहे.या वर्षीची शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. धाड नाका मित्रमंडळाचे तसेच सागवनचे उपसरपंच देवा भाऊ दांडगे यांच्या नेतृत्वाखाली हर्षल पाटील, प्रेम हिवाळे,शुभम दांडगे,सागर काळवाघे,नागेश मुळे, रणजित मराठे ,विजय एडखे, बबन शेळके, राजू पडोल, गौरव हिवाळे, तुषार काळे, करण शेळके, मयुर ताठे, निलेश लहाने, अजय धोमणे, भैया भालेराव, अनिकेत गावंडे ,शुभम पाटील, बंटी मेरत, आकाश निकम, योगेश भोसले, मंगेश गव्हाणे ,घनशाम बिबे, निखिल बिबे, अजय हिवाळे आदी युवक या मित्रमंडळात सहभागी आहे या वर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करणार आहे.

# दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार, दोन जखमी...

**जनसंचलन/ अंढेरा**




पोलिस स्टेशन अंतर्गत १७ फेब्रुवारी २०२४ रोजी दोन वेगवेगळ्या दुचाकी अपघातात एक ठार तर दोन किरकोळ जखमी झाले. शनिवारी सायंकाळी पाच वाजेदरम्यान अंढेरा गावाकडे येणारी दुचाकी घसरली. त्यामुळे चालकाच्या मागे बसलेल्या युवकाच्या डोक्याला मार लागून तो गंभीर जखमी झाला. उपचारासाठी देऊळगाव मही येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. प्रदीप चव्हाण असे मृत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. राधेश्याम पवार हे जखमी झाले आहेत. दुसऱ्या घटनेत आंचरवाडी फाट्याजवळ वसंतनगर फाट्याजवळ एका दुचाकीला भरधाव आयशरने धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाला. त्याला चिखली येथील खासगी दवाखान्यात दाखल केले आहे. वृत्त लिहेपर्यंत गुन्हे दाखल करण्यात आले नव्हते.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरूण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधु होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)